मंगळवार दि.१५ ऑक्टोबर २०२४
⦿ किंमत २ रुपये | महाराष्ट्र
⦿ मराठी दैनिक
⦿ वर्ष : ०२ ⦿ अंक : ४१
⦿ टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

# मनसेची स्वबळावर २५० जागा लढण्याची तयारी:महाविकास आघाडी-महायुतीस चिंता

## राज ठाकरेंच्या निशाण्यावर मोदी,शाह,शिंदे,ठाकरे अन् पवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि भाजप नेत्यांच्या भेटीगाठी वाढल्याने, निवडणुकीत मनसे महायुतीत सामील होणार का ? अशा चर्चा रंगल्या होत्या. आता या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. निवडणुकीत कोणाशी युती नको, कोणाशी आघाडी नको असे म्हणत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा स्वबळाची घोषणा केली.मुंबईतील गोरेगाव येथे झालेल्या मनसे मेळाव्यातून राज ठाकरे यांनी निवडणुकीचे रणशिंग फुंकताना राज्यातील २८८ पैकी किती आणि कोणत्या जागा लढवणार यावर कोणतेही भाष्य केले नाही. २०१९ च्या निवडणुकीत मनसेने १०१ जागांवर उमेदवार उभे केले होते. मात्र, शिवसेनेच्या फुटीमुळे यंदाच्या निवडणुकीत २०० ते २५० जागांवर निवडणूक लढवण्याचा मनसेचा विचार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळते. एकीकडे महायुती, महाविकास आघाडी असा सामना रंगलेला असतानाच, दुसरीकडे मनसेचा स्वबळाचा नारा कुणाच्या पथ्यावर पडणार ? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.



राज ठाकरे म्हणाले, शरद पवार म्हणतात, पक्ष फोडला मग तुम्ही आयुष्यभर काय केले. १९७८ ला काँग्रेस फोडली, १९९१ ला शिवसेना फोडली. तुम्ही कसल्या फोडाफोडीच्या गोष्टी बोलता? अजित पवार भाजपमध्ये येण्याआधी मोदी म्हणतात, ७० हजार कोटींचा घोटाळा करणाऱ्यांना जेलमध्ये टाकू. त्याऐवजी मंत्रिमंडळात टाकलं. हे का होतंय?

राज यांनी उद्धव ठाकरे, शरद पवार, अजित पवार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही निशाणा साधला. राज ठाकरे म्हणाले, आम्हाला सत्ता दिली तर महाराष्ट्र कधी दिल्लीपुढे झुकणार नाही असे म्हणत केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर त्यांनी निशाणा साधला. उद्धव ठाकरे इतिहासातून बाहेर येत नाहीत. सारखे अब्दाली अफजलखान असे बोलत असतात, सारखे वाघ नखं काढत असतात. महाराष्ट्राबद्दल काहीतरी बोल असे म्हणत उध्दव ठाकरेंचा समाचार घेतला. राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा पुष्पा'असा उल्लेख केला. करत त्यांची मिमिक्री केली. मी असा महाराष्ट्र कधी पाहिला नाही. येणाऱ्या पिढ्यांवर काय संस्कार करणार आहोत, असेही त्यांनी सांगितले.लाडकी बहीण योजनेवरूनही राज ठाकरे यांनी शिंदे, फडणवीस सरकारला फटकारले. लाडकी बहीण योजनेचे या महिन्याचे पैसे येतील, पुढच्या महिन्याचे येतील, नंतर पैसे येणार नाही. जानेवारी, फेब्रुवारीत राज्याकडे पगार द्यायला पैसे नसतील. महिलांच्या हातांना काम द्या, कामातून त्या पैसे उभे करतील. त्यांना सक्षम बनवा, असेही ते म्हणाले.

### अमित ठाकरेंसाठी मतदारसंघाची चाचपणी

**मनसेने मुंबईच्या ३६ पैकी २५ जागा लढविल्या होत्या. मनसेने मुंबईतील बोरीवली, जोगेश्वरी, चारकोप, मालाड पश्चिम, अंधेरी पूर्व, मानखुर्द, शिवाजीनगर वांद्रे पश्चिम, वरळी, भायखळा, मलबार हिल आणि कुलाबा या ११ मतदार संघात उमेदवार दिले नव्हते. मात्र यंदा वरळी विधानसभेतून आदित्य ठाकरेंच्या विरोधात मनसेने संदीप देशपांडे यांची जोरदार तयारी सुरू आहे. त्यामुळे राज ठाकरे ११ मतदार संघात उमेदवार देणार का ? असाही प्रश्न उपस्थित होत आहे. तसेच राज ठाकरे यांचे सुपुत्र अमित ठाकरे यंदा निवडणूक लढविण्याची जोरदार चर्चा सुरू आहे. त्यामुळे अमित ठाकरे लढणार असतील तर कोणता मतदार संघ सेफ असू शकतो याचीही चाचपणी सुरू असल्याचे समजते.**

### मराठा समाजाला आरक्षण मिळू शकत नाही

**मराठा समाजाला आरक्षण मिळू शकत नाही. ते होऊ शकत नाही. हे संपूर्ण महाराष्ट्राला माहीत आहे हे खरं बोलण्याचं धाडस फक्त राज ठाकरे करू शकतो. त्यामुळेच मी लोकांना परवडत नसेल असेही राज म्हणाले. समुद्रात पुतळा उभा करायचा असेल तर किमान १५ ते २० हजार कोटी खर्च करावे लागतील.**

# महावाचन उत्सव उपक्रमात आदर्श विद्यालयाचे घवघवीत यश



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा | ज्ञानेश्वर बुधवत**

शिक्षण प्रसारक मंडळ, चिखली द्वारा संचालित आदर्श मराठी प्राथमिक विद्यामंदिर ,सिंदखेड राजा येथील विद्यार्थ्यांनी तालुका स्तरावर दोन क्रमांक पटकावले आहेत.

या शैक्षणिक सत्रात DIET, बुलढाणा व शिक्षण विभाग, जि. प. बुलढाणा द्वारा आयोजित महावाचन उत्सव - २०२४ अंतर्गत घेण्यात आलेल्या उपक्रमात आदर्श मराठी प्राथमिक विद्यामंदिर सिंदखेडराजा येथील चि. प्रथमेश दुधारे याने तालुका स्तरावर प्रथम तसेच चि. गौरव नागरे याने तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.त्यानिमित्ताने मा.श्री. गुलाब खरात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा श्री. बाळासाहेब खरात शिक्षण अधिकारी प्राथमिक, श्री. अनिल अकाळ शिक्षणाधिकारी माध्यमिक, डॉ. वैशाली ठग शिक्षणाधिकारी योजना, डॉ. जगराम भटकर प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,बुलढाणा यांच्या सह इतर मान्यवरांच्या शुभ हस्ते प्रमाणपत्र व ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री.रामकृष्णदादा शेटे, सचिव श्री.प्रेमराजजी भाला तसेच सर्व संचालक मंडळ यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक श्री. एस.टी.मोरे आणि श्री.एस.एम.भुतेकर यांच्या वतीने सत्कार करून कौतुक करण्यात आले.

# सुरेखा मातनेची क्रॉसकंट्री स्पर्धेमध्ये अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरावर निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा | ज्ञानेश्वर येवले**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठच्या नुकत्याच झालेल्या आंतर विभागीय क्रॉसकंट्री १० किलोमीटर रनिंग स्पर्धेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाची सुरेखा मातने हिची बँगलोर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत निवड झाली. सुरेखा मातने हिने अत्यंत खडतर परिस्थितीतून व स्वकष्टाच्या बळावर हे यश संपादन केले आहे. ऊसतोड कामगाराच्या मुलीचा हा संघर्ष प्रत्येक खेळाडू मुलींसाठी प्रेरणादायी आहे.



तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयीन विकास समितीचे चेअरमन आमदार बबनराव पाचपुते, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राहुल जगताप, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य बाबासाहेब भोस, महावीर पटवा, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. महादेव जरे, उपप्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुदाम भुजबळ, जिमखाना विभाग प्रमुख प्रा.संजय अहिवळे, ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. शहाजी मखरे व सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सुरेखा मातनेला शा. शि .संचालिका कल्पना बागुल आणि क्रीडा शिक्षक संजय डफळ, संतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

# निवडणुकीपूर्वी सरकारची दिवाळी भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

एसटी महामंडळाकडून दिवाळीनिमित्त दरवर्षी १० टक्के हंगामी भाडेवाढ केली जाते. मात्र दिवाळीतील प्रवाशांची गर्दी लक्षात घेता यंदा करण्यात आलेली हंगामी भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे. या निर्णयामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील एसटी बसने प्रवास करणाऱ्यांच्या खिशाला कात्री बसण्यापासून सुटका होणार आहे. विधानसभा निवडणुकीमुळे राज्यातील जनतेची नाराजी निर्माण होऊ नये, म्हणून भाडेवाढ रद्द करण्यात आली, असे बोलले जात आहे.

## चारोळी

**डाव नियतीचा**
**कोणा ना घावला**
**तरीही जगणच विसरून माणसा तू**
**आयुष्यभर धाव धाव धावला.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

# उस्माननगर मध्ये शहीद जवान स्मारक काम अंतिम टप्प्यात



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर | गणेश लोखंडे**

उस्माननगर ता कंधार येथील भारतीय सैन्य दलातील शहीद जवान हनुमंत काळे यांच्या स्मरणार्थ ग्रामपंचायत परीसरात शहीद जवान स्मारक उभारण्यात येत आहे.

नांदेड चे माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या २५-१५ अंतर्गत तीन लक्ष रुपये खर्च करून ग्रामपंचायत च्या वतीने ग्रामपंचायत ने दिलेल्या १५ बाय १५ जागेवर उभारण्यात येत आहे.हे शहीद जवान स्मारक गाव व परीसरातील तरुणांना देशसेवेसाठी प्रेरणास्रोत ठरणार असल्याचे मत ग्रामपंचायत सदस्य व शहीद जवान हनुमंत काळे यांचे बंधू शिवशंकर काळे यांनी लोकनेता शी बोलतांना व्यक्त केले.

# व्हाईस ऑफ डिजिटल मीडियाच्या नांदेड जिल्हाध्यक्षपदी भगवान शेवाळेर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव | प्रतिनिधी**

व्हाईस ऑफ डिजिटल मीडियाच्या जिल्हाध्यक्ष पदावर भगवान शेवाळे यांची नुकतीच निवड करण्यात आली असून, नायगाव तालुक्यातील समाधान रिसॉर्ट या ठिकाणी शुक्रवारी सायंकाळी उशिरा झालेल्या संघटनेच्या एका संवाद बैठकीत संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप भाई काळे यांनी तसेच जिल्हाध्यक्ष डॉ.गणेश जोशी यांनी भगवान शेवाळे यांच्या नावाची घोषणा केली.



व्हाईस ऑफ मीडिया या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप भाई काळे हे नूकतेच संघटनेच्या नाम फलकाचे अनावरण करण्यासाठी नायगाव दौऱ्यावर आले असता नांदेड- हैदराबाद राज्य महामार्गावर असलेल्या कृष्णूर एमआयडीसी भागातील समाधान रिसॉर्ट या ठिकाणी तालुक्यातील पत्रकार बांधवांच्या उपस्थितीत एक संवाद बैठक घेण्यात आली.या बैठकीत संदीप भाई काळे यांची प्रमुख उपस्थित होती.यादरम्यान झालेल्या चर्चेत डिजिटल मीडियाच्या जिल्हाध्यक्ष पदावर भगवान शेवाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.१४ महिन्यांपूर्वी डिजिटल मिडियाचे नायगाव तालुकाध्यक्ष म्हणून त्यांची निवड करण्यात आली होती.या कार्याची दखल घेत त्यांना आता जिल्हास्तरावर बढती देण्यात आली आहे.भगवान शेवाळे मागील आठ वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रामध्ये काम करत आहेत. सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेले भगवान शेवाळे हे त्यांच्या तांत्रिक कौशल्याने अनेक समाज हिताचे विषय नेहमीच हायलाईट करीत असतात.पत्रकारिता क्षेत्रातील डिजिटल माध्यमावर त्यांची मजबूत पकड असल्याने राष्ट्रीय अध्यक्ष संदीप भाई काळे यांनी त्यांची जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती केली.दरम्यान संदीप भाई काळे यांच्यासह प्रदेश कार्याध्यक्ष विजय चोरडिया,नांदेड जिल्हाध्यक्ष डॉ.गणेश जोशी,जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब पांडे, उद्योजक ऋषीकेश कोंढेकर, नायगावचे तालुकाध्यक्ष नागेश पाटील कल्याण,उपाध्यक्ष गंगाधर ढवळे, सरचिटणीस माधवराव बैलकवाड, प्रकाश हणमंते आदींनी भगवान शेवाळे यांचा सन्मान करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.यावेळी तालुक्यातील अनेक पत्रकार बांधव उपस्थित होते.दरम्यान संघटनेच्या संपूर्ण टीमचे भगवान शेवाळे यांनी आभार मानले आहेत.

# कड्यात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने भव्य शेतकरी मेळाव्यास प्रतिसाद

## शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळणे काळाची गरज-माजी मंत्री सुरेश धस

## हवामानावर आधारित शेती करा आर्थिक उन्नती होईल-हवामान तज्ञ पंजाबराव डक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

अन्नधान्याचे उत्पादन वाढावे यासाठी हरितक्रांतीनंतर उत्पादन वाढीसाठी रासायनिक खतांचा मोठ्या प्रमाणावर वापर वाढत चालला आहे.अधिकचे उत्पादन वाढीसाठी रासायनिक खते, कीटकनाशके,तणनाशकांचा अतिरेक वाढला आहे. त्याचबरोबर उत्पादन खर्चही मोठ्या प्रमाणावर वाढला आहे.रासायनिक खतांचे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणावर भोगावे लागणार आहेत.यामुळे या पुढील काळात शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री सुरेश धस यांनी केले.तर महाराष्ट्रातील बहुतांश शेती ही जिरायत आहे.सर्वस्वी पावसावरच शेती अवलंबून असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसानीचा फटका शेतकरी वर्गांना बसत आहे.यामुळे शेतकऱ्यांनी हवामान व पाऊस याची माहिती घेऊनच शेती करण्याचे आवाहन हवामान तज्ञ पंजाबराव डक यांनी केले.

ते कडा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आयोजित भव्य शेतकरी मेळाव्यात बोलत होते.

व्यासपीठावर हवामान अभ्यासक पंजाबराव डक,तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे,राजेंद्र दहातोंडे,संदीप खकाळ,संजय आजबे,अशोक पवार,काकासाहेब थेटे,लक्ष्मण ननवरे,संजय गाढवे,आत्माराम फुंदे,अशोक इथापे आदी

उपस्थित होते.कडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने रविवार दि.१३ रोजी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाकडून पुरस्कार प्राप्त बीड जिल्ह्यातील बारा मान्यवरांचा सत्कार माजी आमदार सुरेश धस व हवामान तज्ञ पंजाबराव डक, सभापती रमजान तांबोळी,सचिव हनुमंत गळगटे व संचालक मंडळ यांच्या हस्ते करण्यात आला.यामध्ये प्रियंका गणेश सावंत,केशव श्रीरंग रसाळ,बाबासाहेब नानाभाऊ पिसोरे,श्रीमती विजया गंगाधर घुले,संजय ज्ञानोबा शिंदे,मोहन निवृत्ती पवार,राजेंद्र भानुदास देवरवाडे,अमोल भास्कर मुळे, मुक्ताराम सोनवणे,अर्जुन जनार्दन चव्हाण,विनायक देशमुख यांचा प्रमुख






मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी पुढे बोलताना माजी आमदार सुरेश धस म्हणाले की, येत्या काळात आष्टी मतदारसंघातील जिल्हा परिषद सर्कल निहाय हवामान तज्ञ पंजाबराव डक यांचे मार्गदर्शन शिबिरे घेण्यात येणार असून पंजाबराव डक यांच्या हवामान अंदाजामुळे अनेक शेतकऱ्यांचे कोट्यावधी रुपयाचे नुकसान होण्यापासून वाचत आहे.पंजाबराव डक यांचा अंदाज गेल्या अनेक वर्षापासून खरा ठरत असून मी देखील त्यांचा चाहता झाल्याचे सांगितले.पंजाबराव डक यांना महाराष्ट्र शासनाने शेतीचा ब्रँड अँबेसेडर करण्याची मागणी मंत्रिमंडळासमोर करणार असल्याचेही धस यांनी सांगितले.शासनाने या पुढील काळात शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई ही ड्रोनद्वारे करायला हवी.सरसकट नुकसान भरपाईचे पंचनामे करताना अनेक ठिकाणी अफरातफर होत असून अनेक शेतकरी नुकसान भरपाई पासून मागे राहत आहेत.त्यामुळे शासनाने ड्रोन द्वारे नुकसान भरपाईची पाहणी केल्यास प्रत्येक शेतकऱ्याला नुकसान मिळेल.बीड जिल्ह्यामध्ये कृषी क्षेत्रात काम केलेल्या अनेकांना शासनाने पुरस्कार देऊन गौरविल्याबद्दल त्यांचा सत्कार सोहळा बाजार समितीच्या वतीने करण्यात येत आहे हा एक भाग्याचा क्षण आहे.शेतकऱ्यांनी बिबट्याला घाबरून जाऊ नये तो शेतकऱ्यांचा मित्र असून शेतातील रानडुकरे कमी.करण्याचे तो काम करत आहे कांदा चाळीसाठी सामूहिक हा शब्द काढून टाकून वैयक्तिक लाभाच्या कांदा चाळीसाठी कृषी विभागाकडे शेतकऱ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन केले .मी सभागृहामध्ये कांद्याचे दर पडलेले असताना अनेक वेळेला आवाज उठवला आणि शासनाला अनुदान देण्यास भाग पाडले.कडा कृषी उत्पन्न बाजार समितीला जवळपास २२ कोटी रुपयांचे कांदा अनुदान मिळाले होते.या मतदारसंघांमध्ये फेसबुक आणि व्हाट्सअप वर प्रसिद्धी करणारे काही जण सध्या वावरत आहेत.फेसबुक व सोशल मीडियावर फोटो टाकून जनतेची कामे होत नाहीत.त्यासाठी प्रत्यक्ष फिल्डवर जाऊनच काम करावे लागते.कोरोना काळामध्ये जनमानसामध्ये कोणीही जात नसताना मी अनेक ठिकाणी कोविड सेंटर उभारून लोकांची जीव वाचवण्याचे काम केले.

यावेळी बोलताना पंजाबराव डक म्हणाले की,शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा असून ५० टक्के पेक्षा जास्त शेती ही कोरडवाहू शेती आहे.पावसावरच शेती अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज घेऊन शेती करायला पाहिजे .१९९५ नंतर निसर्गामध्ये बदल झालेला असून अनेक ठिकाणी कधी गारपीट तर कधी दुष्काळाचा सामना करावा लागत आहे.पंजाबराव डक यांनी पाऊस येण्याचे अनेक संकेत उदाहरणासह पटवून देत शेतकऱ्यांना जागृत करण्याचे काम केले.निसर्ग हा आपल्याला पावसाचे संकेत कसा देतो याचे उदाहरणासह त्यांनी शेतकऱ्यांना पटवून दिले.ज्या वर्षी रामफळाच्या झाडाला जास्त फळ लागतात त्यावर्षी दुष्काळ पडतो.विजेच्या बल्ब वर जर किडे आले तर तीन दिवसात पाऊस हमखास येतो.आकाशातून जाताना विमानाचा आवाज जर खाली आला तर ते पाऊस येण्याचे संकेत असतात अशा अनेक प्रकारचे एक ना शेकडो पाऊस येण्याचे संकेत आहेत.ज्यावेळेस सूर्य मावळताना आकाश लाल भडक होते त्यानंतर ७२ तासांमध्ये पाऊस हा निश्चितच येतो हे पावसाचे संकेतही त्यांनी सांगितले.

यावेळी सभापती रमजान तांबोळी यांनी प्रस्ताविक करताना सांगितले की,कडा या ठिकाणी कांद्याची बाजार मोठा असून या ठिकाणी सहा देशांमध्ये कांदा निर्यात केला जातो.यापुढील काळातही कांद्याचे मार्केट करण्यासाठी तालुक्यामध्ये इतर ठिकाणी कांदा खरेदी सुरू करावी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी केशव रसाळ, विनायक देशमुख,बाबासाहेब पिसोरे प्रियंका सावंत आदींनी विचार व्यक्त केले.बाजार समितीचे सचिव यांनी गळगटे यांनी सांगितले की बाजार समिती हा शेतकऱ्यांचा मुख्य घटक आहे त्यामुळेच या शेतकरी मेळाव्याचे आयोजन केले आहे.

सध्या शासकीय हमीभावाने सोयाबीन उडीदाची खरेदी सुरू केली असून शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याची आवाहन त्यांनी केले यापुढेही शेतकऱ्यांना उल्लेखनीय काम केल्याबद्दल मेळावा आयोजित करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.यावेळी मनोज गाढवे,गंगाधर पडोळे,मुरलीधर फसले,योगेश भंडारी,सचिव हनुमंत गळगटे,उपसभापती रमेश तांदळे,अनिल ढोबळे,संजय ढोबळे, संजय मेहेर,परिवंत गायकवाड, राम मधुरकर,अंकुश चव्हाण,बाळासाहेब कर्डीले,शिवाजी अनारसे,बिपिन भंडारी,बबलू शेठ तांबोळी, विजय शेळके,श्याम तळेकर,सचिन घावटे,सय्यद अन्सार,सुनील देशमुख,आदींसह कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक,मान्यवर,पदाधिकारी, पत्रकार,शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कंधार तालुक्यातील १८५ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे उद्घाटन व लोकार्पण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार | धोंडीबा मुंडे**

आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्याहस्ते मंगळवारी १८५ कोटी रूपायांच्या विकास कामांचा उद्घाटन व लोकार्पण करण्यात येणार आहे.यात शहरांतील शंभर कॉटच्या उपजिल्हा रुग्णालयाचा समावेश असून सामाजिक कार्यकर्त्या आशाताई शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत उपजिल्हा रुग्णालयाच्या परिसरात सकाळी साडे अकरा वाजता लोकार्पण सोहळा होणार आहे.



शहरातील उपजिल्हा रुग्णालयासाठी आमदार शिंदे यांनी शासन दरबारी सत्याने पाठपुरावा करून ६६ कोटीचा निधी उपलब्ध करून घेतला. या निधीतून लोहा रोडवर अद्यावत असे रुग्णालयाचे काम झाले आहे. या रुग्णालयामुळे कंधारच्या वैद्यकीय क्षेत्रात क्रांती होणार असून रुग्णांची गैरसोय थांबणार आहे.

पानभोसी ते पांगरा ते खुड्याचीवाडी ते लाठ (खु.) पर्यंत रस्ता ११ कोटी, कंधार सार्वजनिक बाधंकाम विभागातील कर्मचाऱ्यांचे निवासस्थानाचे बांधकाम २.८० कोटी, वंजारवाडी गावात पुल बांधकाम १.०२ कोटी, घोडज ते कंधार रस्ता, बहादरपुरा ते पानभोसी रस्ता १५ कोटी,

बहाद्दरपुरा गावाजवळील मन्याड नदीवरील पुलाचे पोचमार्ग ६ कोटी, कंधार येथील जाधव हॉस्पीटल ते बहाद्दरपुरा गावापर्यंत सी.सी. रस्ता २५ कोटी,

बसवेश्वर महाराज पुतळा ते पांगरा रस्ता बांधकाम १० कोटी, पानशेवडी प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकाम ११.५० कोटी, बहाद्दरपुरा गावातील टॉवर पासुन डॉ. धोंडगे यांच्या घरापर्यंत रस्ता २ कोटी, कंधार येथे शासकीय गोदामाचे बांधकाम ५.७५ कोटी असे एकूण १८५ कोटीच्या विकास कामांचा उद्घाटन व लोकार्पण सोहळा आमदार शिंदे यांच्याहस्ते होणार आहे. या कार्यक्रमास मोठ्यासंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत दादा शिंदे यांनी केले आहे.

# सफाई कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न निघाला मार्गी

## चार दिवसांपासून शहरातील बंद घंटा गाड्या पुन्हा धावनार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**लोणार | विनायक कुटे**

घंटा गाड्या वरील कर्मचाऱ्यांचे वेतन दोन महिन्या पासून थकित होते वारंवार मागणी करून ही वेतन मिळाले नसल्याने शहरातील कचरा संकलीत करणाऱ्या घंटा गड्यांची चाके चार दिवसांपासून थांबल्याने शहरात सनासुदीच्या काळात घानीचे साम्रज्य पसरले होते परंतु आज शिवछत्र मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांनी स्थानिक नगर पालिकेच्या मुख्याधिकारी विभा वराडे यांच्या दालनात बसून घंटा गड्यावरील चालकांच्या



वेतनाचा प्रश्न सोडविन्याची मागणी केली तसेच शहरातील बंदावस्थेत असलेल्या हायमस्ट लाईट लवकर सुरु करण्याची मागणी केली. यावेळी मुख्याधिकारी वराडे यानी तात्काळ कचरा संकलीत करणाऱ्या घंटा गाड्या वरील चालकांच्या प्रलंबित वेतनाच्या देयकावर स्वाक्षरी करून त्यांचा रखडलेला प्रश्न मार्गी लावला यामुळे शहरातील कचरा संकलीत करणाऱ्या गाड्यांची गेल्या चार दिवसापासून थाबलेली चाके आज पासुन पुन्हा धावनार आहे. यावेळी कचरा संकलीत करणाऱ्या घंटा गाड्यावरील सर्व चालक उपस्थित होते. यावेळी आरोग्य निरीक्षक साळवे साहेब,सह बांधकाम अभीयंता कुलकर्णी, पानीपुरवठा अधीक्षक संजय एनेवार, उपस्थित होते.

# ॲड.डॉ.स्वाती मोराळे यांची ग्राहक संरक्षण समितीच्या महाराष्ट्र राज्य कायदेशीर सल्लागार पदी निवड



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नाशिक | प्रतिनिधी**

ॲड.डॉ.स्वाती मोराळे या उच्चशिक्षित असुन नुकतेच त्यांनी एल. एल. बी. पदवी संपादित केली आहे. त्या गेली दहा वर्षे सामाजिक, पत्रकार, उद्योग क्षेत्रात कार्यरत आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचे मोठे नेटवर्क आहे.त्यांनी एम. एस. डब्लू., एल. एल. बी., बी. जे., बी. ए., बी. एड., डी. एड., डी. एस. एम., एम. बी. ए., डी. टी. एल., आणि डी. एल. एल. एल. डब्ल्यू. अशा अनेक क्षेत्रात शिक्षण घेतले आहे. त्यांच्या शिक्षण,अनुभव व संघटनाचा फायदा समितीला होईल यासाठी ग्राहक संरक्षण समितीचे अध्यक्ष दादासाहेब केदारे व सचिव डॉ. अविनाश झोटिंग यांनी ड.डॉ.स्वाती मोराळे यांची समितीच्या महाराष्ट्र राज्य कायदेशीर सल्लागार पदी निवड केली आहे.आज मोठ्या प्रमाणात ग्राहकांची फसवणूक होत आहे. त्याला आळा घालणे, फसवणूक झालेल्या ग्राहकांना कायदेशीर मदत करणे त्यांच्या हक्काचे संरक्षण करणे यासाठी मी प्रयत्न करणार आहे असे त्यांनी सांगितले. ही माझ्यासाठी मोठी संधी आहे आणि याचा फायदा मला व महाराष्ट्रातील लोकांना नक्कीच होईल.

## राज ठाकरे अन् आमचे व्यक्तिमत्व वेगळे

# आम्ही एकत्र आलो तर राज्यातील गड किल्ल्यांच्या विषयाला चांगली दिशा देऊ - संभाजी राजे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर (वृत्तसंस्था)**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणी केली आहे. महायुती, महाविकास आघाडी यांच्यानंतर संभाजी राजे, बच्चू कडू आणि राजू यांनीही एक तिसरी आघाडी स्थापन केली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एकला चलो चा नारा दिला आहे. दरम्यान, विधानसभेला मनसेसोबत येणार का? असा सवाल संभाजी राजे यांना विचारला असता राज ठाकरेंचे आणि आमचे व्यक्तिमत्व वेगवेगळे आहे. त्यामुळे आम्ही एकत्र येऊ हे नाकारु शकत नाही. आम्ही आणि राज ठाकरे एकत्र आलो तर राज्यालील गड किल्ल्यांच्या विषयाला चांगली दिशा देऊ शकतो, असे वक्तव्य संभाजी राजे यांनी केले आहे.

संभाजी राजे म्हणाले, राज ठाकरेंनी स्वबळाचा नारा दिला, ही चांगली गोष्ट आहे. आमची सुरुवात आहे, म्हणून आम्ही महाशक्ती निर्माण केली आहे. प्रस्थापितांपेक्षा आम्ही विस्थापितांना तिकीट देऊ, प्रस्थापित लोक आले तर त्यांना सुद्धा स्वीकारू. महाशक्तीमुळे वातावरण बदलण्या सुरुवात झाली असून चैतन्य निर्माण झाले आहे. त्यांना चांगला पर्याय मिळत आहे. आम्ही जास्तीत जास्त २८८ जागांवर निवडणूक लढवणार असून येत्या तीन-चार दिवसांत चित्र स्पष्ट होईल, असेही संभाजी राजे म्हणाले.

पुढे बोलताना संभाजी राजे म्हणाले, राज ठाकरे जे बोलतात ते पूर्ण चुकीचे बोलत नाहीत. शिवस्मारकासाठी त्यावेळी ३ हजार कोटी रुपये देतो म्हणाले होते. पण आज ती रक्कम १५ हजार कोटी रुपये झाली आहे. उद्या किती होतील? असा सवाल संभाजी राजे यांनी उपस्थित केला आहे. गड-किल्ले जिवंत स्मारके आहेत. त्यांचे संवर्धन व्हायला पाहिजे. सत्ताधारी आणि विरोधकांनी राज्यातील गड किल्ल्यांसाठी ७५ वर्षांत काय केले याचे उत्तर द्यावे. मी सरकारकडे २५ किल्ले मागितले. आम्ही पैसा उभा करतो असेही म्हटले. तरीही ते द्यायला तयार नाहीत. राज ठाकरे आणि मी या विषयावर एकत्र आलो, तर महाराष्ट्र गड किल्ल्याच्या विषयाला चांगली दिशा देऊ शकतो, असा विश्वास संभाजी राजे यांनी व्यक्त केला.संभाजी राजे यांनी राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येवरही भाष्य केले. राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडली असून खुलेआम हत्या होत आहेत. महिला-भगिनी देखील असुरक्षित आहे. याचे उत्तर जनता नक्कीच देईल, असे संभाजी राजे म्हणाले.



# उमरखेड पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष अधिकार शंकर पांचाळ यांनी १२ तासाच्या आत खुनाच्या आरोपीला ठोकल्या बेड्या

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

उमरखेड पोलीस स्टेशन उमरखेड येथे तक्रारदार रतेराव अप्पाराव सोळंके वय ७० वर्ष धंदा सेवानिवृत्त रा. महागाव रोड जि. प. कॉलनी उमरखेड यांनी तक्रार दिली की, त्यांचा पुतण्या मृतक सुमीत प्रभाकर सोळंके वय २३ वर्ष रा. जिल्हा परिषद कॉलनी महागाव रोड उमरखेड हा दि. १२/१०/२०२४ रोजी चे सकाळी ०९:०० वा. दरम्यान हा कामा निमीत्ताने नेहमी प्रमाणे घराबाहेर गेला व सायंकाळी उशीरापर्यंत तो घरी परत आला नाही म्हणुन दिनांक १३/१०/२०२४ रोजी पोलीस स्टेशन येथे तो हरविल्याबाबत रिपोर्ट दिली त्यावरून पोलीस स्टेशन उमरखेड येथे मिसींग क्र.५७/२०२४ दाखल करून शोध सुरू होतो.

दरम्यान दुपारी १२ वाजताच्या सुमारास माहीती मीळाली की, सुमित हा चुरमुरा शेत शिवारातील जंगलामध्ये मृत अवस्थेत पडुन आहे. लगेच पोलीसांनी घटनास्थळी जाऊन पाहिले असता चुरमुरा फाट्यापासुन चुरमुरा फुलसावंगी रोडवर रोड पासुन सुमारे १०० मीटर अंतरावर जंगलात मृतक सुमीत प्रभाकर सोळंके वय २३ वर्ष जिल्हा परीषद कॉलणी उमरखेड याचे प्रेत रक्ताने माखलेले मला दिसुन आले त्याचा चेहरा कपडे व शरीरयष्टीवरुन ते प्रेत सुमीतचे असल्याचे खात्री झाली. त्याच्या मानेवर व गळ्यावर कापल्याच्या जखमा दिसल्या.

कोणीतरी अज्ञात आरोपीने मृतकचा खुन केल्याचे दिसत असल्याने तक्रारदार रतेराव अप्पाराव सोळंके यांनी दिलेल्या तक्रारीवरून अपराध क्र.६८८/२०२४ कलम १०३ (१) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा नोंद करून तपासामध्ये घेतला.

गुन्ह्याचे गांभिर्य लक्षात घेता मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. पियुष जगताप सर यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन आरोपी आरोपीने केलेल्या खुनाची मोडस पाहता आरोपी शोध बाबत महत्वपूर्ण सुचना दिल्या. उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग उमरखेड श्री. हनुमंत गायकवाड साहेब व पोलीस स्टेशन उमरखेड पो. नि. श्री. पांचाळ साहेब यांच्या



आदेशाने वेगवेगळ्या टीम तयार करून आरोपी च्या शोध साठी रवाणा करण्यात आल्या. स्थानीक गुन्हे शाखा यवतमाळ येथील अधिकारी सपोनि गजानन गजभारे, पोउपनि शरद लोहकरे यांचे पथक तपास करीत असतांना मृतक हा त्याचा चुलत मामा संदीप अवधुत जगताप रा. नेर ता. माहूर याच्या मोटार सायकलवर बसुन जातांना दिसल्याने त्याच्यावर संशय बळावल्याने आरोपीला ताब्यात घेण्यासाठी एक टीम नेर ता. माहूर येथे रवाणा केली.

आरोपी हा मृतक च्या अंतविधीसाठी आला आहे अशी माहिती मिळाल्याने आरोपीला महागाव रोडवरून ताब्यात घेऊन त्याला गुन्ह्याबाबत विचारणा केली असता आधी त्याने उडवा उडविची उत्तरे दिली परंतु विश्वासात घेऊन विचारणा केली असता आरोपी ने गुन्ह्याची कबुली दिल्याने आरोपीला गुन्हात अटक करण्यात आली आहे.

आरोपी याने मृतकला पैशाच्या वादातुन धारदार शस्त्राने गळा चिरुन खुन केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले असुन अधिक तपास सुरु आहे.

सदर ची कारवाई मा. पोलीस अधीक्षक सा. यवतमाळ श्री. कुमार चिंता सर, मा. अपर पोलीस अधीक्षक सा. श्री. पियुष जगताप सर, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. हनुमंत गायकवाड सर यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार पो. नि. शंकर पांचाळ, तपास अधिकारी सपोनि निलेश सरदार, सपोनि कैलास भगत, सपोनि पांडुरंग शिंदे, प्रशिक्षणार्थी पोउपनि सागर इंगेळे, स्थानीक गुन्हे शाखा यवतमाळ येथील अधिकारी सपोनि गजानन गजभारे, पोउपनि शरद लोहकरे पोहवा मुंडोकार, पोहवा रनखांब, पोहवा जाधव, पोहवा बोरगे, पोशि ताज, पोशि पंडागडे, चालक पोउपनि श्रीरामे, पो.स्टे. उमरखेड चे पोहवा विजय पतंगे, पोहवा दत्ता पवार, पोहवा दिनेश चव्हाण, नापोशि मोहन चाटे, नापोशि संतोष राठोड, प्रोशि गजानन गिते, पोशि गजानन आडे, चालक पोहवा अवदुत हिंगाडे, पोशि मिरासे यांनी केली.

# दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर आमदार डॉ.तुषार राठोड यांचा विविध विकासकामाचा धडाका

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

आमदार डॉ. तुषार राठोड यांच्या विकास निधीतून कुरूळा सर्कल मधील अनेक रस्ते पूलांचे उदघाट्न व लोकार्पण पार पडले.यावेळी आमदार डॉ तुषार राठोड यांनी मुखेड /कंधार मतदार संघासाठी निधी कमी पडू देणार नाही येणाऱ्या काळात मतदार संघाचा काय पालट करणार असे प्रतिपादन केले.

राज्यामध्ये सत्तांतर होऊन महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर मुखेड कंधार विधानसभा मतदारसंघातील नादुरुस्त रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली. बहुतांश कामे पूर्ण झाली आहेत. काही प्रगतीपथावर आहेत. व काहींचे काम लवकरच सुरू होईल. आज या कामांचे उद्घाटन सोहळे पार पडत आहेत.मुखेड-कंधार विधानसभा मतदारसंघातील कुरुळा/ पेठवडज या सर्कल मधील ११ कोटी ०८ लाख रुपयांच्या कामाची आज उद्घाटने व लोकार्पणे पार पडत आहेत.या गावांतर्गत व शेजारच्या गावातर्गत केलेल्या विकास कामाचे आज लोकार्पण व भूमिपूजन



खुशालराव पाटील उमरदरीकर, लक्ष्मन पाटील खैरकेकर,लालबा पाटील शिंदे, व्यंकटराव लोहबंदे, यादवराव चिवडे, हणमंतराव नरोटे,नागोराव पाटील कमळेवाडी, बबन दबडे, जी.एम.पवळे, मरशिवने मामा,राजीव मूकणर,सुभाष मरशिवणे, दत्ता देवपूजे, माणिक ढवळे, बळी पाटील कार्तला, आदी प्रमुख पद्धधिकारी आ.डॉ.तुषार राठोड साहेब यांच्या विशेष प्रयत्नातुन गावातर्गत विविध विकास कामाचा आज लोकार्पण करण्यात आला.हसूळ ते हंगरगा रस्त्याची सुधारणा करणे, ९०.००लक्ष रु दलितवस्ती सी.सी.रस्ता १०.०० लक्ष गावातर्गत सी.सी.रस्ता बांधकाम करणे.१४.०० लक्ष रु पांदण रस्ता शेतकरी यांच्यासाठी १ की.मी. २५.०० लक्ष रु हे काम मंजूर केले असून या रस्त्यावरील पूल व रस्त्याचे काम पूर्ण झाले असून या कामाचे लोकार्पण करण्यात आले. गुट्टेवाडी गावातर्गत विविध विकास कामाचा आज लोकार्पण करण्यात आला. जोडरस्ता गुट्टेवाडी रस्त्याची सुधारणा करणे.५०.०० लक्ष रु दलितवस्ती सी सी.रस्ता करणे १०.०० लक्ष रु. गावातर्गत सी.सी.रस्ता. १०.०० लक्ष रु स्मशानभुमी बांधकाम करणे .१०.०० लक्ष रु गावातर्गत सी.सी रस्ता ८.०० लक्ष रु रस्ता रस्ता गुट्टेवाडी ते रामानाईक तांडा २ की.मी. ५०.०० लक्ष रु ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम करणे.२०.०० लक्ष रु २५१५ नवीन ५.०० लक्ष रु. सी.सी.रस्ता करणे इत्यादी कामाची लोकार्पण भूमिपूजन करण्यात आले या गावातील हासूळ विठ्ठल तिकटे,बालाजी होळगीर, विनायक देवकत्ते, वैजनाथ यादव, वसंत देवकत्ते, दत्ता करले, मारोती बोरगीर, बाबारावं यादव, सुरेश देवकत्ते, उद्धव यादव, भीमाशंकर यादव, बालाजी भोईगिर, नागोराव भोईगिर, न्यानबा भोईगिर, आनंद भोईगिर, काशीराम भोरगिर, नामदेव यादव.गुट्टेवाडी केशव गुट्टे सरपंच सुनील गुट्टे,संतोष गुट्टे,त्रिपती गुट्टे, ज्ञनोबा गुट्टे,गोविंद गुट्टे,दिलीप वाघमारे, रोहिदास वाघमारे,भगवत गुट्टे, नामदेव गुट्टे, माणिक गुट्टे, गोविंद गुट्टेश्रीमत गुट्टे,बालाजी गुट्टे,संतोष गुट्टे,मधुकर गुट्टे, गावकरी, महिला, पुरुष मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा परिषद,मुखेड अभियंता बसवदे साहेब अभियंता, अधिकारी उपस्थित होते.

# बाळासाहेब बुद्धे यांची निवड



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

लोहा येथील युवा पत्रकार बाळासाहेब बुद्धे यांची युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या लोहा तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी त्यांना नियुक्तीपत्र दिले बाळासाहेब बुद्धे हे बेरळी या छोट्याशा खेड्यातून वृत्तपत्र छायाचित्रकार म्हणून काम करत होते व पुन्हा विविध वृत्तपत्रांमध्ये काम केले ते पत्रकारिता क्षेत्रातील अनुभवी व्यक्ती असून त्यांची नियुक्ती करण्यात आली त्याबद्दल त्यांचे मित्र परिवाराकडून अभिनंदन व कौतुक होत आहे.



**काल नांदेड येथे आ.तुषार राठोड यांनी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण साहेब यांची भेट घेतली असता यावेळी माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी खासदार हेमंत पाटील,आ.अमर राजूरकर उपस्थित होते.**

# रामदास पाटील सुमठाणकर यांच्या जनसेवा कार्यालयाचे उद्घाटन मोठ्या थाटात संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

हिंगोली येथे भाजपा नेते रामदास पाटील सुमठाणकर यांच्या जनसेवा कार्यालयाचे उद्घाटन मोठ्या थाटामध्ये संपन्न झाले असून यावेळी गांगलवाडी येथील महंत गिरी महाराज, ह भ प सोपान महाराज शास्त्री यांच्या हस्ते या जनसेवा कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले असून या उद्घाटन प्रसंगी, भाजपा कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित हिंगोली विधानसभेतील नागरिकांचे कामे करण्याची सोय व्हावी याकरिता भाजपा नेते रामदास पाटील सुमठाणकर यांनी हिंगोली येथील तापडिया बिझनेस कॉम्प्लेक्स येथे जनसेवा कार्यालयाचे उद्घाटन केले असून या कार्यक्रमाला उपस्थित माजी आमदार बळीराम पाटील कोटकर, माजी आमदार गजाननराव घुगे, रमेशचंद्र बगडिया, मनीष साखळे, बाबाराव जी बांगर, दुर्गादास साखळे, शिवाजीराव मुटकुळे, मिलिनी याबल,पप्पू चव्हाण, यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते,

# खानवटे येथील गटरचाऱ्यांची बिले आदा करू नका : उपअभियंता ढाके

## उपअभियंता ग्रामिण पाणीपुरवठा दौंड यांनी दिले आदेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

खानवटे ता.दौंड येथील भूमिगत गट योजनेचे काम हे १५ वा वित्त आयोगाच्या निधीतून तिन ठिकाणी करण्यात आले आहे.हे काम अतिक्रमण मध्ये शासकीय गायरान गट नंबर २८८ मध्ये झालेले आहे.या कामाची कसलीही परवानगी जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडून घेतलेली नसून सदरचे क्षेत्र हे जिल्हाधिकारी पुणे यांच्या मालकीचे असून विनापरवाना खोदाई करून गटर योजनेचे काम शासकीय जागेत करण्यात आले आहे.तसेच झालेले काम हे अतिशय निकृष्ट दर्जाचे केले असून,शाखा अभियंता पाणीपुरवठा विभाग पंचायत समिती दौंड आणि उपअभियंता पाणीपुरवठा विभाग पंचायत समिती दौंड यांनी कामाची पाहणी न करता,काम इस्टिमेट नुसार न



करता,गटरचारीचे खोदाईचे काम इस्टिमेट प्रमाणे न करता,चेंबरची संख्या कमी करून गटरचे पाईप फक्त दिड फुट गाढलेले आहेत. चेंबर लांब अंतरावर टाकलेले आहेत.त्यामुळे गटरपाईप लाईन ही जमिनीच्या वरच असून ती फुटण्याची दाट शक्यता आहे.तसेच चेंबर जास्त अंतरावर असल्याने गटचारी जाम (ब्लॉक) होऊन लिकेज होऊन दुर्गंधी पसरण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे या कामात लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे.म्हणून संबंधित कामाविषयी माजी सरपंच बबनराव धायतोंडे यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती दौंड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे,जिल्हा अधिकारी पुणे यांच्याकडे लेखी तक्रार करून संबंधित दौंड पंचायत समिती चे पाणी पुरवठा विभागाचे शाखा अभियंता योगेश दिवेकर आणि उपाभियंता यांना निलंबित करण्याची मागणी केली आहे.त्यामुळे गटविकास अधिकारी पंचायत समिती दौंड यांनी कार्यकारी अभियंता पा.पु.विभाग जि.प.पुणे यांना आपल्या स्तरावरून चौकशी करण्यात यावी असे दि.०७/१०/२०२४ रोजी लेखी कळविले आहे.

त्यामुळे आता पाणीपुरवठा विभाग पंचायत समिती येथील उपअभियंता स्नेहा ढाके यांनी ग्रामसेवक ग्रामपंचायत खानवटे यांना लेखी कळविले आहे,की संबंधित कामाची संपूर्ण चौकशी होईपर्यंत बिल अदा करण्यात येऊ नये असा लेखी आदेश दिला आहे.

त्यामुळे संबंधित ठेकेदार आणि शाखा अभियंता योगेश दिवेकर यांचेवरती काय कारवाई होणार याकडे सर्व खानवटे ग्रामस्थांचे लक्ष लागून राहिले आहे.

# चुकीची गरळ ओकत दोन समाजात द्वेष निर्माण करणाऱ्या आ.पवार यांच्या निषेधार्थ आज नरसी बंद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

एखाद्या कार्यक्रमात आपण आमदार या नात्याने बोलत असताना कुठल्या गोष्टीचे भान असावे त्या गोष्टीचा काय परिणाम होतो याचीही जाणीव नसताना की जाणून बुजून दोन समाजात द्वेष निर्माण करण्यासाठी चुकीची गरज ओकणारे आ.राजेश पवार यांनी आयोजित सभेत बोलताना वर्षेनू वर्षे नरसी चौकात सत्यशोधक डॉ.आण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याचे प्रकरण संविधानिक मार्गाने वादात असताना ,या नरसी चौकात डॉ.अण्णा भाऊ साठे नव्हे तर त्या ऐवजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसला पाहिजे अशा मताचा मी आहे.असे विधान दिनांक ११ ऑक्टोंबर रोजी आयोजित कार्यक्रमात जाणुन बुजुन विधान केले.

विकृत बुध्दी असलेल्या या आमदार महाशयानी बौद्ध आणि मातंग समाजामध्ये वाद लावून आपली राजकीय पोळी भाजण्याचे षडयंत्र रचले होते परंतु या दोन्ही समाजातील जागृत युवकांनी राजेश पवार यांचा डाव वेळीच लक्षात घेऊन त्यांची सदर सभा उधळून लावली आणि दि.१५ /१० /२०२४ रोजी नरसी येथे सत्यशोधक डॉक्टर अण्णाभाऊ साठे चौकात जाहीर निषेध म्हणून व्यापार पेठ व रस्ता रोको आंदोलन करण्यात येत आहे तरी सर्व समाज बांधवांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन देविदास सूर्यवंशी, गंगाधर कोतेवार,बबलू सूर्यवंशी,साईनाथ कांबळे,सचिन भेदे,लालबा सूर्यवंशी,दिनेश सूर्यवंशी,शिवाजी सूर्यवंशी,शुभम भेदे,यादव वाघमारे अदीने यांनी केले आहे.



नरसी बंदच्या आंदोलनाविषयी आमदार राजेश पवार यांना आपली भूमिका समजण्यासाठी फोन केले असता त्यांनी फोन घेतलेला नाही.

# मेहकर लोणार तालुक्यातील प्रलंबित समस्या तत्काळ निकाली काढा,अन्यथा ठिय्या आंदोलन-वंचित नेते नागवंशी संघपाल पनाड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघातील सुलतानपूर तालुका लोणार येथून गेलेल्या शेगाव पंढरपूर पालखी मार्ग लगतच्या वार्ड क्रमांक १,२,५,६,व ईतर वार्डामध्ये राहणाऱ्या शेकडो नागरिकांच्या घरांमध्ये पाणी घुसून त्या कुटुंबाला उघड्यावर पाडणाऱ्या जबाबदार अधिकारी व पदाधिकारी यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करून,पावसाच्या पाण्याची विल्हेवाट लाऊन,नुसकानग्रस्त कुटुंबीयांना तात्काळ मदत करण्यात यावी.

सध्या शासनाच्या वतीने बँकेमार्फत विविध योजना राबविण्यात येत आहे त्यामध्ये लाडके बहिण योजना संपूर्ण महाराष्ट्रभर गाजत आहे त्यामध्ये बँकेमध्ये केवायसी च्या नावाखाली बँकेच्या अधिकारी कर्मचाऱ्याकडून महिलांची पिळवणूक होत आहे. त्यामध्ये महिलांना तूछपणाची वागणूक देण्यात येते. कर्मचाऱ्याकडून होणारी पीळवनूक तत्काळ थांबवण्यात यावी. व सुलतानपूर तालुका लोणार येथील सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखेमध्ये गावातील रहिवासी हे बँकेमध्ये कर्मचारी आहेत ते बँकेमध्ये येताना नशेमध्ये असतात त्यांची बँक ग्राहकांना बोलण्याची पद्धत वेगळी असते ते बॅक ग्रहाकाना उडवाउडवीची उत्तरे देऊन ग्राहकांना बँकेतून हाकलून देतात. अश्या बेजबाबदार बँक कर्मचाऱ्यावर निलंबनाची करून कारवाई करण्यात यावी. तथा स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा लोणार येथील कर्मचारी सुद्धा अशाच पद्धतीने बँक ग्राहकांसोबत अरेरावी भाषा करतात करतात. असे ह्या मेहकर – लोणार मतदारसंघातील सर्व बँकेच्या कर्मचाऱ्यांची बैठक बोलवून त्यांना समज देण्यात यावा व चांगली सेवा देणारे कर्मचारी बँकेमध्ये देण्यात यावे. सध्या मेहकर – लोणार तालुक्यामध्ये महावितरण चे प्लास्टिक केबल बंच चे काम सुरू आहे. हे काम अंदाजपत्रकानुसार न करता अतिशय बोगस पद्धतीने सुरू आहे तत्काळ हे काम थांबून बोगस काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करून अंदाजपत्रकानुसार काम करणाऱ्या ठेकेदाराला काम देण्यात यावे व सध्या नवरात्र सन उत्सवाचे दिवस आहेत तथा ओहरलोड घ्या नावाखाली अनेक ठिकाणी लोड शेडिंग घेण्यात येते ती तत्काळ थांबवून वीज ग्राहकांच्या अनेक समस्या आहेत त्यामध्ये फ्यूज जाणे,डिओ जाणे टाकण्यासाठी वायरमनला फोन करण्यात येतो परंतु फोन लागत नाही. अशा बेजबाबदार कर्मचाऱ्यावर कार्यवाही करण्यात यावी गेल्या दोन ते तीन वर्षापासून शासनाच्या वतीने ई- पीक पाहणणीसाठी मोठा गाजावाजा करण्यात येत आहे. परंतु ई-पिक पाणीही शेतकरी वर्गासाठी डोकेदुखी ठरत आहे.कारण की प्रत्येक शेतकऱ्याकडे अँड्रॉइड मोबाईल नसल्यामुळे काही शेतकऱ्यांना मोबाईलची माहिती नसल्यामुळे ई- पीक पाहणी पासून हजारो शेतकरी मुकले आहेत. म्हणून शासनाला विनंती असेल पूर्वीप्रमाणे तलाठ्या मार्फत पीक पेरा भरण्यात यावा .

शासनाच्या वतीने शेतकऱ्यांसाठी नागरिकांसाठी अतिवृष्टी ग्रस्, आपत्तीग्रस्त नागरिकांसाठी शासनाच्या वतीने आर्थिक मदत देण्यात येते. परंतु ई- केवायसी च्या नावाखाली शेतकरी व नुकसानग्रस्त नागरिकाची मुस्कटदाबी होते. त्यामुळे शासनाच्या वतीने देण्यात येणारी मदत ही उदात्त हेतूने देऊन, ई- केवायसी अट रद्द करण्यात यावी.

अनेक वर्षापासून मेहकर लोणार तालुक्यातील नागरिकांचे रमाई आवास योजना, पंतप्रधान आवास योजना, मोदी आवास योजना, शबरी आवास योजना या योजनेमध्ये नावे समाविष्ट असून मंजूर आहेत. परंतु उद्दिष्टे नसल्यामुळे ते लाभार्थी घरकुल पासून वंचित आहेत. करिता घरकुलाचे उद्दिष्ट तात्काळ देण्यात यावे व अनेक मंजूर काही लाभार्थ्यांना १५ हजाराचा पहिला हप्ता मिळाला परंतु उर्वरित अनुदान आज पर्यंत मिळाले नाही. त्यामुळे त्यांना तत्काळ अनुदान देण्यात यावे, घरकुल धारकाच्या अनुदानामध्ये शासनाकडून दुजाभाव करण्यात येतो. तो म्हणजे शहरासाठी अडीच लाख व ग्रामीण साठी एक लाख २५ हजार हा दुजाभाव थांबून ग्रामीणसाठी व शहरासाठी सुद्धा ५ लाख अनुदान देण्यात यावे.

शेतकरी राजाला उत्पादन खर्चानुसार भाव मिळत नसल्यामुळे शेतकरी राजा संकटात सापडला आहे. यावर्षी शेतकरी राजाच्या पिकांवरती अनेक रोगांचा प्रादुर्भाव झाला. तसेच परतीच्या पावसानेही अतोनात



नुकसान केले त्यामुळे शेतकरी राजाला सरसकट कर्जमाफी देऊन, हेक्टरी ५० हजार रुपये मदत देण्यात यावी कृषी केंद्र मार्फत शेतकरी राजाचे होणारी आर्थिक लूट थांबून कृषी केंद्राच्या दर्शनी भागावर रेट बोर्ड लावण्यात यावे. व शेतकरी राजाची आर्थिक पिळवणूक करणाऱ्या कृषी केंद्र चालकाचा परवाना रद्द करून त्याच्यावर कारवाई करण्यात यावी.

लोणार सरोवरे जगातील तिसऱ्या क्रमांकाचे खाऱ्या पाण्याचे सरोवर आहे शासनाच्या वतीने कोट्यावधी रुपयाचा निधी येतो परंतु विकास होताना दिसत नाही येणाऱ्या पर्यटकांसाठी स्वच्छतागृह,मुत्री घरे, राहण्याची व्यवस्था नाही. येजा करण्यासाठी व्यवस्थित रस्ते नाहीत,मेहरबान साहेब वरिष्ठ स्तरावरून सरोवराच्या कामाकडे काळजीपूर्वक लक्ष देऊन घेणाऱ्या निधीचा योग्य वापर करून पर्यटकाला चांगल्या सुविधा देण्यात याव्या व लोणार शहराचे मूळ रहिवासी यांना पाण्यासाठी आजही टँकरने पाणी विकत घ्यावे लागते व जे सर्वसाधारण गरीब कुटुंब आहेत त्यांना डोक्यावरती पाणी आणावे लागते नळाला येणारे पाणी हे दोन ते तीन महिन्यातून एकदा येते आणि तीही दूषित पाणी येते पाण्याचा विषय हा गांभीर्यपूर्वक घेऊन शहरवासीयाचे पाण्याची भटकंती थांबून शुद्ध पाणी देण्यात यावे.

लोणार येथील लोणार शहराला लागून २००८ पासून मंजुरात मिळाली परंतु कामाला सुरूवात झालेली नाही. शहरांमध्ये अनेक वाहनांची वर्दळ असते या शहरातून शेगाव पंढरपूर महामार्ग गेलेला आहे याच ठिकाणाहून पूर्णा नदी जवळ असल्यामुळे रेतीचे वाहने भरधाव वेगाने य जातात अनेक नागरिकांना रेतीच्या वाहनामुळे आपले प्राण गमावले लागले आहे. तरी बायपास रोडच्या कामाला तात्काळ सुरुवात करण्यात यावी.

लोणार तालुक्याचे ग्रामीण भागाचे मुख्यालय म्हणजे पंचायत समिती कार्यालय हे कार्यालय अतिशय जिर्ण होऊन मोडकळीस आले आहे. कार्यालयाच्या ठिकाणी तालुक्यातील नागरिकांची वर्दळ असते त्यामुळे इमारत कोसळून जीवित हानी होण्याची दाट शक्यता आहे. करिता पंचायत समिती कार्यालय लोणार सरोवरच्या काठावरून हलवून हिरडव रोड वर्ती असलेल्या ई क्लास गट नं १३७,१३८,१३९ नंबर वरती रिंग रोड ला लागून नगर पालिका डिपी प्लॅन रोडला लागून, तत्काळ पंचायत समिती कार्यालयाचे काम सुरू करण्यात यावे.

लोणार शहराला लागून लिंबी तलावाला करोड रुपयाचा सौंदर्यकरणासंदर्भात शासनाकडून निधी आला आहे. त्यामध्ये लोणार शहराची मान उंचवण्यासाठी सर्व महापुरुषांचे पुतळे तलावाच्या मध्यभागी बसवण्यात यावे. व लोणार शहरातील बेरोजगारांचा विचार करून तलावाच्या तिन्ही साईडला गाळे काढण्यात यावे.

सुरेश राणे ऊर्फ रामगिरी महाराज यांनी मुस्लिम धर्माचे संस्थापक प्रेषित मोहंमद पैगंबर यांच्या बद्दल अपशब्द बोलून दोन समाजात तेढ निर्माण करणाऱ्या भोंदू महाराजावर गुन्हा दाखल करून तात्काळ अटकत करण्यात यावी. व समाजात समाजामध्ये तेढ निर्माण करणाऱ्या भाजप आर एस.एस चा नेता नितेश राणे मुस्लिम धर्मीयांच्या मस्जीदीबद्दल, धर्माबद्दल अपशब्द वापरून दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे काम करत आहे. त्याच्यावर भाषण बंदी करून कायदा व सुव्यवस्था बिघडवल्या बाबत गुन्हा दाखल करण्यात यावा. व त्याच्यावर सार्वजनिक ठिकाणी भाषण बंदी करण्यात यावी.

सर्व खरेदी विक्रीचे कागदपत्रे नियमानुसार असतानाही आर्थिक देवाण-घेवाण करण्यासाठी जाणीवपूर्वक खरेदी विक्री करणाऱ्या नागरिकांची पिळवणूक करणाऱ्या व परवानगी च्या नावाखाली खरेदी विक्री अधिकारी व कर्मचारी यांच्या कडून होत असलेली नागरिकांची लूट थांबवून दोषी असणाऱ्या सर्व अधिकारी कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

सुलतानपूर ग्रामपंचायत तालुका लोणार अंतर्गत तांडा वस्ती अंतर्गत लाखो रुपयांचे काम शासनाच्या वतीने करण्यात आली परंतु तांडा वस्तीतले कामे तांडा वस्तीमध्ये न करता इतरत्र ओळवून अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आशा बेजबाबदार सरपंच अधिकारी व ठेकेदारावर गुन्हे दाखल करून तांडा वस्तीतीतिल कामे तांडा वस्तीत करण्यात यावे, व शासनाची दिशाभूल करून जे बिले काढण्यात आली ती बिले ठेकेदाराकडून वसूल करण्यात यावे. अन्यथा आपल्या कार्यालयामध्ये ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नागवंशी संघपाल पनाड होणार यांनी दिला. यावेळी निवेदन देताना नागवंशी संगपाल पनाड, मेहकर- लोणार विधानसभा वंचित नेते,दीपक अंभोरे,महेंद्र मोरे ,शे.अखतर भाई,शेख सरदार भाई, रंजीत मोरे, शेख जियाउल्ला, कैलास मोरे, दीपक पाडमक, राहुल पाडमुख, सिद्धार्थ अवसरमोल, ड ,बबन वानखेडे, शेख राजिक शेख सुभान, शेख अस्लम, गफार शाह भाई, शेख अमीर शेख अहमद, फिरोज भाई गवळी इत्यादी उपस्थित होते.

# क्रांतिकारी शिक्षक संघटना महाराष्ट्राचे मुख्य कार्यालयाचे उद्घाटन संपन्न



लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

बीड शहरातील बशीरगंज चौकात क्रांतिकारी शिक्षक संघटनेच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन माजी मंत्री जयदत्त(आण्णा) क्षीरसागर यांच्या शुभ हस्ते संपन्न झाले. या वेळी क्रांतिकारी शिक्षक संघटनेचे नेते श्री.शहीद कादरी सर यांनी क्रांतिकारी शिक्षक संघटने बाबत माहिती दिली. या प्रसंगी मार्गदर्शक श्री.हाफिज साहेब, श्री. नरशिगजी नायकवाडे साहेब, संघटनेचे विभागीय अध्यक्ष अय्युब सर, श्री.शशिकांत गायकवाड, आसरार खान सर, श्री.अजीज सर, श्री.मुफ्ती सर, श्री.मजहर सर, श्री.तोफिक सर, श्री.फजल सर, श्री.जावेद सर, श्री.आंबेद सर, श्री.रज्जाक सर, श्री.इमरान सर, श्री.शाहेद सर, जफर सर, वहीद भाई, श्री.शिनगारे सर, श्री.पवार सर, श्री.मुळे सर, श्री.युनूस सर, श्री.परवेज सर, वासिम भाई, अन्वर कादरी, फेरोज भाई, कैसर सर, आबेद सर, तसेच पदधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रदूषण नियंत्रण मंडळाचा कारभार म्हणजे आंधळं दळतय आणि कुत्र पिठ खातय


## वासुंदे परिसरात ९ क्रशरला परवानगी आणि चालू मात्र १८

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे (वृत्तसंस्था)**

वासुंदे तालुका दौंड आणि परिसरातील ग्रामस्थ गेली तिन ते चार महीने झाले प्रदुषण नियंत्रण विभाग,महसुल विभाग,महापारेषाण विभाग,परीवाहन विभाग बारामती,या सर्व कार्यालयाकडे वासुंदे आणि परिसरातील क्रशर विषयी तक्रार करीत आहेत, परंतु. गेंड्याच्या कातडीचे प्रशासन चोरालाच साथ देत आहेत.असा आरोप वासुंदे येथील सामाजिक कार्यकर्ते हनुमंत जामले यांनी केला आहे.

महापारेषाण विभागाचे अधिकारी यांनी फक्त पाहणी करायची आणि निवद-नारळ घेयचा आणि पसार होतच.येवढच करायच हा उद्योग गेली चार सहा महिने चालू



आहे.

क्रशर च्या एका बाजूला रोटी गाव असून १-५ ज्ञा अंतरावरती अभयारण्य( वनपरिक्षेत्र ) असून हे संपुर्ण अधिकारी वर्गाला माहीत आहे तर दुसऱ्या बाजूस जिरेगाव मध्ये १ ज्ञा अंतरावरती अभय आरण्य आहे.हेपण माहित असून आपण परवानग्या कश्या दिल्या हा सर्व ग्रामस्थांना पडलेला मोठा प्रश्न आहे. १८ क्रशर पैकी ९ क्रेशर मालकांकडे ालिल ची परवानगी नाही तरीपण सगळं सुस्तीथीत, राजरोस,रात्रंदिवस अधिकाऱ्यांच्या नाकावर टिचून जोरात चालू आहे.याला कोण जबाबदार आहे.

एवढा धुळीचं त्रास नागरिकांना होतोय कसलीच उपाययोजना नाही परिसरातील कित्येक लोकांना श्वसनाचा त्रास होत आहे.याचा कोण विचार करणार आहे का नाही का माणसं किडा-मुंगी सारखी मेलेली पाहायची इच्छा खान मालकांना आणि अधिकारी यांना झाली आहे हे समजायला तयार नाही. सर्रास बोर लश्ररींं(ब्लास्टिंग) चालू आहे परिसरातील सर्रास घरांना तडे गेलेत इतका मोठा आवाज होतो कि कुठे बॉम्ब पडला आहे असा आवाज होत आहे.हा आवाज प्रशासनाला ऐकू येत नाही का? परवानगी देताना नक्की काय पाहिलं हा हि संशोधनाचा विषय आहे,कसलीच उपाय योजना नसताना आपण क्रशर ला परवानग्या दिल्याच कश्या हे न सुटणारे कोड म्हणावे लागेल.

# श्रीकृष्ण वासुदेव समाज मंदिर ट्रस्टच्या अध्यक्षपदी सौ.केसरबाई घोटकर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाशी । किशोर सुरवसे**

विजयादशमीच्या मुहूर्तावर श्रीकृष्ण वासुदेव समाज मंदिर समितीची बैठक १२ ऑक्टोंबर रोजी बार्शी जिल्हा सोलापूर येथे पार पडली. या बैठकीत भविष्यकालीन विचार करून महत्त्वपूर्ण ठराव पास करण्यात आले. सांप्रदायिक कुटुंबातील एक आदर्श महिला सौ. केसरबाई धनाजी घोटकर यांची ट्रस्टच्याअध्यक्षपदी निवड करण्यात आली.श्रीकृष्ण वासुदेव समाज मंदिर ट्रस्टच्या अध्यक्षा तसेच पहिल्या महिला अध्यक्षा होण्याचा मान त्यांना मिळाला.एका महिलेची निवड करून वासुदेव समाजाने एक आदर्श निर्माण केला आहे.संयोजक समितीच्या वतीने ठराव मंजूर झाला आशी स्वाक्षरी करून बैठकीची सांगता झाली.समितीची बैठक सदस्य श्री नवनाथ घोडके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. समितीचे प्रमुख श्री नागनाथ अडसूळ यांनी ठराव मांडला आणि सर्वप्रथम ठरावास अनुमातीची मागणी केली तसेच सर्वानुमते सहमती घेतली.अनुमोदन खजिनदार श्री संभाजीराव घोडके यांनी केले.आभारप्रदर्शन पत्रकार श्री अमोल सातपुते यांनी केले बैठकीस उपस्थित मान्यवर खालील प्रमाणे होते.श्री नागनाथ अडसूळ,श्री संभाजी घोडके,ह.भ.प.धनाजी महाराज घोटकार,श्री नवनाथ घोडके,श्री अमोल सातपुते,श्री वीरेंद्र अडसूळ,श्री मनोज (आप्पा) शिंगनाथ,श्री नेताजी शिंग्रथ,श्री मुन्ना भाया कानारे,श्री समाधान घोटकर,श्री प्रकाश कानडे,श्री सागर भय्या अडसूळ,श्री दिपक साळवी,श्री सखाराम शिंगनाथ व सखल वासुदेव समाज महाराष्ट्र राज्य.




# जिजामाता हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे वाचले रुग्णाचे प्राण

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेडराजा । ज्ञानेश्वर बुधवत**



उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी कल्याणकारी संघटनेचे राज्यस्तरीय पहिले एकदिवसीय अधिवेशन हे दि.९ ऑक्टोबर रोजी मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे जिजाऊ सृष्टी येथे आयोजित करण्यात आले होते.या एकदिवसीय अधिवेशनाला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून उमेद अभियानाच्या महिला हजारोंच्या संख्येने उपस्थित होत्या.कार्यक्रमा दरम्यान धुळे जिल्ह्यातील मनिषा पवार यांच्या छातीमध्ये अचानक तिव्र वेदना होऊ लागल्या असता त्या चक्कर येऊन खाली कोसळल्या असता त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या जिजामाता हॉस्पिटल व महिला आरोग्य केंद्राचे समाधान देशमुख, बाळासाहेब कठोरे व लता मगर यांनी तात्काळ त्यांना सि.पि.आर देत रुग्णवाहिकेतून रुग्णांस तातडीने दवाखान्यात दाखल केले व उपचार सुरू केले वेळेवर उपचार मिळाल्याने सदरील महिलेचे प्राण वाचले. उमेद अभियानाच्या वतीने जिजामाता हॉस्पिटल व महिला आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांचे आभार मानत त्यांचे कौतुक केले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904